


दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे




●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ५ वे ●अंक २७७ ●बुधवार,दि.०७ जानेवारी २०२६ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये

● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com ● Mo. 9822152955

# बीड पुन्हा हादरलं ! तरुणावर गोळीबार, दोन गोळ्या झाडल्या नंतर चाकूने भोसकून हत्या

**बीड । प्रतिनिधी**

फुटलेली पाईपलाईन दुरुस्त करत असलेल्या प्लंबर वर सुरुवातीला दोन गोळ्या झाडण्यात आल्या. या घटनेनंतर जखमी प्लंबर जीव वाचवण्यासाठी पळत असताना त्याच्यावर धारदार शस्त्राने वार करून हत्या करण्यात आल्याची खळबळ जनक घटना अंकुशनगर, साई पंढरी लॉन्सच्या समोर दुपारी अडीच तीन च्या सुमारास घडली.

हत्या,गोळीबार यासारख्या घटना बीडमध्ये सामान्य झालेल्या आहेत. गुन्हेगार कायद्याची ऐसी तैसी करत पोलिसांच्या इज्जतीची लक्तरं वेशीवर टांगू लागली आहेत. पोलीस अधीक्षकांपासून सगळीच पोलीस यंत्रणा आत्मस्तूतीतच मग्न असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. सध्या कायदा सुव्यवस्थेची कशी घडी बसवली आहे याची टीमकी नववर्षाच स्वागत करत असताना एस पी कडून वाजवली जात होती. मात्र चार-पाच दिवसातच ही टिमकी फुटली गेली. अवैध धंद्याची भरमार सुरू असताना कायदा सुव्यवस्था




कशी चांगली राहत असते हे न उलगडलेल कोडं कायम आहे.यामध्ये सर्वसामान्य जनतेचं जगणं दहशतीच्या सावटाखाली येऊन कायदा सुव्यवस्थेचे धिंडवडे निघत आहेत. याच स्थितीचा अनुभव बीडकरांना पुन्हा अनुभवायला मिळाला. भर दुपारी अडीच ते तीन च्या सुमारास प्लंबिंग चे काम करणाऱ्या हर्षद तुळशीराम शिंदे वय ३५ वर्ष, (रा. हाउसिंग कॉलनी धानोरा रोड बीड) नावाच्या तरुणावर गोळीबार झाला. यावरच हे प्रकरण थांबलं नाही तर जखमी झालेल्या हर्षद शिंदे जीव वाचवण्यासाठी पळत असताना त्याचा पाठलाग करून धारदार शास्त्राने वार करत त्याची हत्या केल्याची घटना अंकुश नगर भागात घडली. हर्षद शिंदे हा

नगरपालिकेत कॉन्ट्रॅक्ट बेसवर असलेला कर्मचारी अंकुशनगर भागात साई पंढरी लॉन्ससमोरील पाईप लाईन फुटली म्हणून त्या ठिकाणी दुरूस्तीचे काम करत होता. त्यावेळी ही घटना घडली.या घटनेनंतर आरोपी विशाल संजय सूर्यवंशी वय ३० वर्ष, (रा. अंकुश नगर धानोरा रोड बीड) हा पळून गेल्याची माहिती आहे. घटनेची माहिती मिळताच शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे पथक तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. परिसरात पंचनामा करण्यात आला असून मृतदेह पुढील तपासासाठी रुग्णालयात पाठवण्यात आला आहे. पोलिसांनी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू केली असून आरोपीच्या शोधासाठी विशेष पथके रवाना करण्यात आली आहेत. दिवसाढवळ्या झालेल्या गोळीबाराच्या घटनेमुळे बीड मधील कायदा -सुव्यवस्थेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

# बीड शहरातील नागरिकांच्या समस्या मार्गी लावण्यासाठी भाजप आक्रमक

## भाजप गटनेत्या डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांच्यासह नगरसेवकांचे सीओंना निवेदन



**● मुख्याधिकाऱ्यांचा सकारात्मक प्रतिसाद**

**भाजपच्या शिष्टमंडळाने केलेल्या मागण्या पूर्ण करण्यात येतील. आवश्यक ती कार्यवाही करुन नागरिकांना अधिकाधिक सुविधा देण्याचा प्रयत्न नगरपरिषद प्रशासनाचा राहील, असा सकारात्मक प्रतिसाद मुख्याधिकाऱ्यांनी दिला आहे. यावेळी नगरसेवकांनी प्रभागातील समस्या मांडल्या.**

**बीड । प्रतिनिधी**

नगरपरिषद निवडणुकीनंतर बीड शहरातील विविध प्रभागांमधील नागरिकांनी मूलभूत नागरी सुविधांबाबत मोठ्या प्रमाणात तक्रारी व मागण्या केल्या आहेत. त्या तातडीने मार्गी लावाव्यात, अशी मागणी नगरपरिषदेतील भाजपच्या गटनेत्या डॉ.सारिकाताई योगेश क्षीरसागर यांनी मुख्याधिकारी शैलेश फडसे यांच्याकडे मंगळवारी (दि.६) निवेदनाद्वारे केली आहे. यावेळी भाजपच्या नगरसेवकांसह पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती. बीड ▶ उर्वरित पान २ वर

# महाराष्ट्रातील सर्व जिल्हा परिषद शाळा बंद करण्याचा सरकारचा मोठा निर्णय

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील सर्व जिल्हा परिषद शाळा बंद करण्याचा सरकारचा मोठा निर्णयमहाराष्ट्रामध्ये सर्व जिल्हा परिषद शाळा बंद करण्याचा कोणताही अधिकृत निर्णय नाही, उलट कमी पटसंख्या असलेल्या शाळा बंद न करता त्यांचे क्लस्टर (समूह) शाळांमध्ये विलीनीकरण करण्याचा शिक्षण विभागाचा विचार आहे, ज्याचा उद्देश शिक्षणाचा दर्जा सुधारणे आहे, पण याला विरोध होत आहे कारण



यामुळे काही शाळा बंद होऊन विद्यार्थ्यांना दूर जावे लागते आणि शिक्षणाचा हक्क कायद्याचे उल्लंघन होऊ शकते, असे मत आहे.

शासनाने कमी पटसंख्या असलेल्या शाळा बंद करणार नाही, असे आश्वासन दिले आहे, परंतु शाळांचे एकत्रीकरण करण्याचा निर्णय घेतला आहे. कमी पटसंख्या असलेल्या शाळांमधील शिक्षणाचा दर्जा सुधारणे आणि सोयीसुविधा पुरवणे हा या निर्णयामागील उद्देश आहे, असे शिक्षण विभाग सांगते. यामुळे १५,००० शाळा बंद होऊ शकतात, ज्यामुळे विद्यार्थ्यांची पायपीट वाढेल आणि शिक्षणापासून वंचित राहण्याची शक्यता आहे, अशी टीका होत आहे. सरकारचा उद्देश शाळा बंद करणे नसून, कमी पटसंख्या असलेल्या शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी उत्तम शिक्षण व्यवस्था ▶ उर्वरित पान २ वर

# जे झालं ते गंगेला मिळालं, साहेबांचे नेतृत्व दूरदृष्टीचे नेतृत्व, अजित पवारांकडून राष्ट्रवादीतील रेष मिटवण्याचे संकेत

**मुंबई । प्रतिनिधी**

पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण चांगलच तापल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. या महानापालिका निवडणुकीच्य निम्ताने दोन्ही राष्ट्रवादी एकत्र आल्या आहेत. पुणे आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिका निवडणुकीत दोन्ही राष्ट्रवादी एकत्र



लढत आहेत. त्यामुळं पुढच्या काळात ▶ उर्वरित पान २ वर

# भाजपने ओवेसींच्या एमआयएमशी युती केली, अकोट महानगरपालिकेत चक्रावणाऱ्या घडामोडी

**अकोट । प्रतिनिधी**

पार्टी विथ डिफरंस' अशी ओळख सांगणाऱ्या भाजपने सत्तेसाठी सारीच तत्व गुंडाळून ठेवलीत का?, असा प्रश्न आता उपस्थित होतोय. अंबरनाथ नगरपालिकेत सत्तेसाठी काँग्रेसशी आघाडी करणाऱ्या



भाजपने अकोला जिल्ह्यातील अकोटमध्ये सत्तेसाठी चक्क 'एमआयएम'सोबत आघाडी केलीये. नुकत्याच झालेल्या नगरपालिका निवडणुकीत अकोटमध्ये भाजपच्या माया धुळे या नगराध्यक्षपदी विजयी झाल्यात. मात्र, ३५ ▶ उर्वरित पान २ वर

## आष्टी मतदारसंघातील रोजगार हमीची कामे सुरळीत सुरू होणार..

# विरोधकांनी स्टंटबाजी करू नये : आ.सुरेश धस

**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी पाटोदा आणि शिरूर (कासार) तालुक्यातील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अंतर्गत मंजूर झालेली वैयक्तिक आणि सार्वजनिक कामे लवकरच सुरळीत होणार आहेत दि.३१ मार्च पर्यंतच महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमीची प्रलंबित कामे करावयाची असून अपूर्ण कामांना प्राधान्याने पूर्ण केल्यानंतरच नवीन कामांना सुरुवात



करण्यात येणार आहे त्याचबरोबर ज्या लाभार्थ्यांनी कामे पूर्ण करून ही निधी अप्राप्त असेल त्या लाभार्थ्यांचे कामाची पाहणी करण्याचे संबंधित यंत्रणेला आदेश देण्यात आले असून या कामाची खात्री करून लाभार्थ्यांना निधी वितरित करण्यात येणार आहे दि.१एप्रिल २०२६ पासून विकसितभारत-जी राम जी योजनेअंतर्गत कामांना सुरुवात ▶ उर्वरित पान २ वर

# छ.संभाजीनगर लातूर सह १६ बाजार समित्यांना मिळणार राष्ट्रीय दर्जा



**● शेतकऱ्यांना होणार फायदा!**

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील शेतकऱ्यांसाठी राज्य सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. राज्यातील छ. संभाजीनगर लातूर सह राज्यातील १६ महत्वाच्या कृषी उत्पन्न बाजार समित्यांना आता राष्ट्रीय दर्जा देण्याचा निर्णय झाला आहे.

याचा अर्थ असा की, आता या बाजार समित्या केवळ स्थानिक किंवा राज्य स्तरावर मर्यादित राहणार नाहीत, तर देशभरातील ई-नाम प्रणालीशी जोडल्या जातील. यामुळे शेतकऱ्यांना त्यांचा शेतीमाल अधिक सुरक्षित आणि जास्त भावात विकता येईल. सरकारने या निर्णयासाठी आवश्यक कायदे आणि दुरुस्ती केली असून, विधी व न्याय विभागाने याचे गॅझेटही प्रसिद्ध केले आहे.

सध्या या निर्णयासाठी कोल्हापूरसह राज्यातील सोळा बाजार समित्यांची माहिती मागवण्यात आली आहे. यामध्ये बाजार समित्यांमध्ये वर्षभरात येणारी आवक आणि त्यातील परराज्यातून येणारा शेतीमाल याची माहिती विचारण्यात आली आहे. ज्या बाजार समित्यांमध्ये ८० हजार टनांपेक्षा जास्त मालाची आवक होते, अशा ५१ बाजार समित्यांना राष्ट्रीय दर्जा मिळणार आहे. पहिल्या टप्प्यात ▶ उर्वरित पान २ वर




# चंदन चोरांची टोळी जेरबंद; सव्वा आठ लाख रुपयाचा मुद्देमाल जप्त


**बीड । प्रतिनिधी**

पोलिसांनी धर्मापुरी पानगाव रस्त्याच्या डाव्या बाजूस असलेल्या गायरान जमिनीत छापा मारून चंदन चोरांची सात जणांची टोळी जेरबंद करण्यात यश मिळवलं. सहाय्यक पोलीस अधीक्षक ऋषिकेश शिंदे यांच्या पथकाने केलेल्या कारवाईत तीन लाख रुपयाचे १०४ किलो चंदनासह सव्वा आठ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

अंबाजोगाई चे सहाय्यक पोलीस अधीक्षक ऋषिकेश शिंदे



यांना सोमवार दि. ५ जानेवारी रोजी चंदनाची खरेदी विक्री होत असल्याची खात्रीलायक माहिती सूत्रांकडून मिळाली. माहिती मिळताच धर्मापुरी पानगाव रस्त्याच्या डाव्या बाजूला असलेल्या गायरान जमिनीत रात्री नऊच्या सुमारास पोलिसांनी छापा मारला. यावेळी बेकायदेशीररित्या चंदनाची तस्करी पप्पु बाबुराव सूर्यवंशी वय ४० वर्ष, राहुल पप्पु सूर्यवंशी वय २३ वर्ष, तेजस कल्लप्पा कांळीबे वय २५ रा. अशोक नगर, परळी, जि. बीड,नितीन सटवा जाधव वय २२, रा. हनुमान नगर, परळी, जि. बीड अविनाश व्यंकट जाधव वय २३ वर्ष,व्यंकट रामचंद्र जाधव वय ४५ (दोन्ही रा. फुलेनगर, उदगीर, जि. लातूर ,भारत निवृत्ती गायकवाड वय ४०, रा. नाकलगाव, ता. माजलगाव, जि. बीड.हे ▶ उर्वरित पान २ वर






# शिक्षणतज्ज्ञ सावित्रीबाई फुले



आधुनिक महाराष्ट्राच्या शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक जडणघडणीमध्ये अनेक समाजसुधारकांनी आपले योगदान दिले आहे. यामध्ये अनेक स्त्री समाजसुधारकांचाही समावेश होता. पंडिता रमाबाई, ताराबाई शिंदे, रमाबाई रानडे, आंनदीबाई जोशी अशा स्त्रीयांनी समाजसुधारणेचे कार्य हाती घेतले होते. त्यातीलच एक महत्व पूर्ण स्त्री जिने स्त्री शिक्षणास प्रारंभ केला. शिक्षण क्षेत्रात क्रांती घडवून आणली ती म्हणजे सावित्रीबाई फुले होय. अज्ञानाच्या अंधारात खितपत पडलेल्या स्त्रीयांना ज्ञानाचा प्रकाश सावित्रीबाईनी दाखवला. त्यांनी लावलेल्या ज्ञानज्योतीच्या प्रकाशामुळेच आज स्त्रिया प्रत्येक क्षेत्रात आहेत. डॉक्टर, इंजिनिअर, वकील, शिक्षक या सर्व क्षेत्रात स्त्रीया दिसतात. रेल्वे. विमान सुध्दा चालवतात इतकेच काय पण देशाच्या पंतप्रधानही होतात. आज मी हा जो शोध निबंध लिहित आहे याचे श्रेय जाते ते सावित्रीबाईनाच. सावित्रीबाईनी आयुष्यभर स्त्री शिक्षणासाठी प्रयत्न केले. पुर्वीच्या काळी स्त्रियांवरती अनेक बंधने होती. स्त्रीयांची अवस्था गुलामांपेक्षाही वाईट होती. मुलगी जन्माला येणे सुद्धा अशुभ मानले जाई. जन्मभर तिची उपेक्षा होई. ज्ञानार्जनास स्त्रीयांना मनाई असे. स्त्रीने फक्त चूल आणि मूलच पहावे असा समाजाचा समज होता. ही सारी स्थिती बदलण्यासाठी १९ व्या शतकात एका स्त्रीने प्रयत्न केले त्या स्वीचे नाव सावित्रीबाई! स्त्री जातीच्या उत्कर्षासाठी मोलाचे कार्य ज्यांनी आपल्या पतीच्या खांद्याला खांदा लावून केले अशा स्त्री जातीच्या उध्दार कर्त्या म्हणजेच सावित्रीबाई! त्यांनी समाजाला 'चूल आणि मूल' हा मंत्र विसरायला भाग पाडून एक नविन मंत्र दिला तो म्हणजे 'चूल मूल आणि शिक्षण'. अशा थोर क्रांती ज्योतीचे कार्य आपणास नक्कीच स्फुर्तिदायी ठरेल. जोतिबांना व सावित्रीबाईना शिक्षणाचे महत्व कळले होते. शिक्षणाशिवाय माणसाची प्रगती होणार नाही हे समजले होते. आपल्या समाजाची ही दैन्यावस्था ही शिक्षण न घेतल्यामुळे झाली आहे हे त्यांनी जाणले. विद्या हेच धन! विद्येनेच माणसाला माणूसपण येते. समाजातील भेदाभेद, उच्चनिचपणा, दारिद्र्य हटवायचे असेल तर ज्ञानाला पर्याय नाही. जोतीबांनी सरकारी नोकरी न धरता शिक्षणकार्याला वाहून घ्यायचे ठरवले. सावित्रीबाईंनी त्यांना खंबीरपणे साथ द्यायचं ठरवलं. मग निश्चय झाला मुलीसाठी शाळा काढण्याचा.

०१ जानेवारी १९४८ रोजी बुधवार पेठेतील भिडे यांच्या वाडयात मुलींसाठी पाहिली शाळा सुरु झाली. स्त्रीयांच्या प्रगतीसाठी सावित्रीबाईनी पहिलं पाऊल उचललं. या कार्यात त्यांना सगुणाबाई व तात्यासाहेब भिडे यांनी खूप मदत केली. सुरुवातीला शाळेत ०६ मुली आल्या. सुरुवातीला शाळेत येण्यास कुणीच तयार होईना. मुलींनी शिकणे ही कल्पनाच लोकांना मान्य नव्हती. मग सावित्रीबाई घरोघरी जावून पालकांना शिक्षणाचे महत्व पटवून देवू लागल्या. स्वतः सावित्रीबाई या मुलींना शिकवू लागल्या. कारण पुरुषाने मुलींना शिकवणे ही कल्पनाच समाजाला मान्य नव्हती. सावित्रीबाई स्वतः शिक्षिका तर झाल्याच पण शाळेच्या मुख्याध्यापिका म्हणूनही काम करु लागल्या. सावित्री बाईचे हे कार्य सर्वाथीने महान आहे. महाराष्ट्रातल्या त्या पहिल्या स्त्री शिक्षिका !

त्या काळात एवढे मोठे सामाजिक काम हाती घेणे सोपे नव्हते. 'स्त्रियांकरिता शाळा' हा विचारच लोकांना सहन होणारा नव्हता. स्त्री-शिक्षण म्हणजे अनर्थ व अधार्मिक कार्य आहे असे समजले जात होते त्यामुळे समाज बिथरला. लोकांना ही गोष्ट आवडली नाही. प्रथम मुलींच्या शाळेला शिक्षकच मिळेना तेंव्हा सावित्रीबाईंनी शिक्षकाची धुरा स्वतः सांभाळली. त्या नियमित शाळेत जावू लागल्या. मुर्लीना शिकवू लागल्या. मुलींना स्वच्छतेचे महत्व पटवून देवू लागल्या शाळेत मूलींना कंटाळा येवू नये म्हणून त्यांना गोष्ट सांगत, खेळ शिकवत असत.

एक बाई ऐटीत शाळेत जाते. मुलींना शिकवते ही गोष्ट सनातनी कर्मठ लोकांना पटली नाही. तसेच सावित्रीबाईंच्या कार्याला कडवा विरोध करणारा तत्कालीन ब्राम्हण समाज होताच. असंतोषाचा प्रचंड स्फोट समाजात झाला. धर्म बुडाला म्हणून ओरड सुरु झाली. सनातन्यांचा संताप शिंगेला पोहचला. सावित्रीबाईना त्रास देवून त्यांचे हे कार्य बंद पाडण्याचे अनेक प्रयत्न केले गेले.

**– कु.काजल प्रफुल्ल पिसाळ, बीड**

◆ पान ९ वरून पुढे...

## बीड शहरातील....

शहरातील पाणी पुरवठा, स्वच्छता, विद्युत व्यवस्था, आवास योजना, पार्किंग, महसूल वाढ, तसेच बिंदुसरा नदी सुशोभिकरण यासारख्या महत्त्वाच्या विषयांवर सविस्तर मागण्या मांडण्यात आल्या. निवेदनात पुढे म्हटले की, प्रामुख्याने नागरिकांना दोन ते तीन दिवसाआड नियमित पाणी पुरवठा कसा करता येईल, याबाबत नियोजन करावे. काडीवडगाव व माजलगाव बॅक वॉटर येथे सोलार सिस्टीम बसवून वीजबिलाचा खर्च कमी करण्यासाठी प्रयत्न करावेत. तसेच, काडीवडगाव-ईट बीड पाईपलाईनवरील गळती तातडीने दुरुस्त करावी. बिंदुसरा धरणावरून धानोरा रोड मार्गे नवीन पाणीपुरवठा योजनेचा प्रस्ताव तयार करून शासनाकडे मंजुरीसाठी पाठवावा, अशीही मागणी करण्यात आली आहे. सर्व प्रभागांमध्ये घंटागाड्या नियमित व नियोजनबद्धपणे फिरतात की नाही, यावर नियंत्रण ठेवावे. घंटागाड्यांवर जीपीएस ट्रॅकर बसवून त्या सध्या कोणत्या भागात आहेत, याची माहिती नागरिकांना मिळेल, अशी व्यवस्था करावी. तसेच नवीन घंटागाड्या, कॉम्पॅक्टर व जेसीबी खरेदी करण्याची मागणीही करण्यात आली आहे. शहरातील छोट्या चौकाचौकात मिनी हायमास्ट बसवावेत. नवीन पथदिवे बसवून बंद किंवा नादुरुस्त असलेले पथदिवे तातडीने सुरू करावेत. नगर परिषद कार्यालयावर सोलार सिस्टीम बसवावी आणि मोठ्या चौकांतील हायमास्ट दिवे नियमितपणे सुरू ठेवावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. शहरातील सर्व मालमत्तांची नोंद नगर परिषदेच्या रेकॉर्डमध्ये घेऊन त्यावर योग्य ती कार्यवाही करावी, जेणेकरून नगर परिषदेच्या महसुलात वाढ होईल. तसेच, पंतप्रधान आवास योजना व रमाई घरकुल योजनेचे नवीन प्रस्ताव मंजूर करावेत. तसेच ज्यांना घरे मंजूर झाली आहेत, त्यांचे पुढील हप्ते तातडीने वितरित करावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. बीड शहरात विविध ठिकाणी सार्वजनिक पार्किंगची सुविधा निर्माण करावी. दर चतुर्थीला वेळेवर सायरन वाजवण्यात यावा. तसेच, बिंदुसरा नदी सुशोभिकरणाचा प्रस्ताव शासनाकडे मंजुरीसाठी पाठवावा, अशीही मागणी केली आहे. शहरातील नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित या सर्व नागरी सुविधा तातडीने पूर्ण करण्यात याव्यात, अशी मागणी डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी निवेदनात केली आहे. या मागण्यांकडे नगर परिषद प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देऊन त्वरित कार्यवाही करावी, अशी अपेक्षा नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

## महाराष्ट्रातील सर्व...

करणे हा आहे, परंतु या निर्णयामुळे शाळा बंद होण्याचा धोका निर्माण झाला आहे, असे सध्याच्या परिस्थितीवरून दिसते. यावर्षी जिल्हा परिषद शाळांमधील बदली प्रक्रिया पूर्ण झाली आहे. त्यांतर्गत ६६ हजार ५२० शिक्षकांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. कमी विद्यार्थी असणाऱ्या जिल्हा परिषदेच्या शाळा बंद होणार नाहीत, असे आश्वासन

◆ पान ९ वरून पुढे...

ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी विधानसभेत दिले. ऑक्टोबरपर्यंत बदली प्रक्रिया राबविली जाते. त्यामुळे शैक्षणिक सत्रादरम्यान शिक्षकांच्या अनुपस्थितीमुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणात अडचण येते. ही प्रक्रिया जूनपर्यंत पूर्ण करण्यात यावी, अशी मागणी विधानसभेत करण्यात आली. हा मुद्दा विचाराधीन आहे. आगामी वर्षात मे अखेरपर्यंत राज्यातील शिक्षकांच्या रिक्तपदाबाबत विरोधाभास असल्याचे दिसून आले. मंत्र्यांनी एकूण स्वीकृत पदांची संख्या १९०९०३ सांगितले. त्यापैकी १७६६१४ कार्यरत आहेत आणि सुमारे १५१५८ पदे रिक्त आहेत. चंद्रपूर जिल्ह्यात ४७२ पदे रिक्त आहेत. मागील माहितीनुसार रिक्तपदांची संख्या ३७ हजार होती आणि आज शुक्रवारी मंत्र्यांनी १५ हजार १५८ रिक्तपदे असल्याचे सभागृहात सांगितले. जिल्हा परिषद शाळांमध्ये शिक्षणाचा खेळखंडोबा झाला आहे, त्यामुळे सरकारने या रिक्त जागा लवकरात लवकर भराव्यात अशी मागणी काँग्रेस विधिमंडळ विधानसभेत प्रश्नोत्तराच्या काळात राज्यातील जिल्हा परिषदेतील प्राथमिक शिक्षकांच्या बदलीबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आला. एकीकडे शिक्षकांची पदे रिक्त आहेत. दुसरीकडे राज्यात ५५ हजार जिल्हा परिषदेच्या शाळा बंद करण्याच्या बातम्या येतात. शिक्षण हा इतका महत्वाचा विषय असूनही सरकार याकडे दुर्लक्ष करत आहे. चंद्रपूर जिल्ह्यात शिक्षकांची पदे रिक्त आहेत. सात वर्ग आणि फक्त तीन शिक्षक त्यामुळे सरकारने राज्यात शिक्षकांची किती पदे रिक्त आहेत, आणि एका मर्यादित कालावधीत या जागा भराव्यात. मंत्री जयकुमार गोरे यांनी राज्यात १५ हजार शिक्षकांची पद रिक्त असल्याची माहिती सभागृहात दिली.

## जे झालं...

दोन्ही राष्ट्रवादीचं विलीनीकरण होणार का? असा प्रश्न पडत आहे. याच पार्श्वभूमीवर राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मोठं वक्तव्य केलं आहे. मागचं झालं गेलं गंगेला मिळालं, आता आपण एकोप्याने काम करायचं आहे. साहेबांचं नेतृत्व म्हणजे पुढची दृष्टी असणारं नेतृत्व आहे, असे अजित पवार म्हणाले. त्यांच्या या वक्तव्यामुळं दोन्ही राष्ट्रवादीचं विलीनीकरण होणार असल्याचे संकेत मिळत आहेत. आम्ही यावेळेस तुतारी आणि घड्याळाला बरोबर घेतलं आहे. आम्हाला वाद घालायचा नाही. मागचं झालं गेलं गंगेला मिळालं, आता आपण एकोप्याने काम करायचं आहे. साहेबांचं नेतृत्व म्हणजे पुढची दृष्टी असणारं नेतृत्व आहे असे अजित पवार म्हणाले. केंद्राचं आणि राज्याचं राजकारण महापालिकेत आणायचं नाही. तिथलं राजकारण तिथं ते इथं आणायचं नाही असे अजित पवार म्हणाले. पिंपरी चिंचवड शहरातील भ्रष्टाचाराचा आका कोण? असा सवाल करत त्या आकाला संपवायचं आहे, असा एल्गार अजित पवार यांनी केला. पिंपरी चिंचवड शहरातील भ्रष्टाचाराचा आका आपल्याला संपवायचा आहे. त्या आकाला आपल्याला त्याची जागा दाखवायची आहे असे अजित पवार म्हणाले. पिंपरी चिंचवड महानगर पालिकेच्या निवडणुकीच्या प्रचारार्थ आयोजीत करण्यात आलेल्या सभेत अजित पवार बोलत होते. अजित पवार

◆ पान ९ वरून पुढे...

यांच्या या वक्तव्यानंतर राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. २५ वर्षांची आमची कारकिर्द पाहा आणि यांची गेल्या ८ ते ९ वर्षांच्या कारकीर्द पाहा असे अजित पवार म्हणाले. आमच्याकडे सत्ता होती तरी आम्ही सत्तेचा माज येऊ दिला नाही. सत्तेची मस्ती कधी येऊ आम्ही दिली नाही असे अजित पवार म्हणाले अनेक समाजाला आण्ही प्रतिनिधीत्व करण्याची संधी दिली. आपल्याला पिंपरी चिंचवड शहराला देशातील पहिल्या क्रमांकावर घेऊन जायचं आहे. त्यासाठी माझ्या विचारांची माणसे विजयी करा असे आवाहन यावेळी अजित पवार म्हणाले.

## भाजपने ओवेसींच्या...

सदस्यांच्या नगरपालिकेत भाजपला बहुमत मिळालं नाहीये. अकोटमध्ये ३५ पैकी ३३ जागांची निवडणूक झालीय. यात भाजपला ११ जागा मिळाल्यात. अशातच आता अकोट नगरपालिकेत भाजपने आपल्या नेतृत्वात 'अकोट विकास मंच' स्थापन केलाय. या 'अकोट विकास मंचा'त भाजपनंतर सर्वाधिक ५ जागा जिंकणारा एमआयएम भाजपचा मित्रपक्ष झालाय. याशिवाय या आघाडीत ठाकरेंची शिवसेना, शिंदेंची शिवसेना, अजित पवारांची राष्ट्रवादी, शरद पवारांची राष्ट्रवादी आणि बच्चू कडूंचा प्रहार जनशक्ती पक्ष सहभागी झालाय. कालच या नव्या आघाडीची नोंदणी अकोला जिल्हाधिकाऱ्यांकडे करण्यात आलीये.भाजपचे नगरसेवक रवि ठाकूर या नव्या आघाडीचे गटनेते असणारायेत. या आघाडीतील सर्वच पक्षाच्या नगरसेवकांना आता भाजपचा 'व्हिप' पाळावा लागणारेय. १३ जानेवारीला होत असलेल्या उपनगराध्यक्ष आणि स्विकृत सदस्यांच्या निवडीत ही आघाडी एकत्रितपणे मतदान करणारेय. या आघाडीचे आता सध्याच्या ३३ सदस्य संख्येत २५ सदस्य झालेयेत. तर नगराध्यक्षा माया धुळे या २६ व्या सदस्य आहेत. अकोट नगरपालिकेत काँग्रेसचे ६ आणि वंचितचे २ सदस्य विरोधी पक्षात असणारायेत.अकोट नगरपालिकेत नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीत एमआयएमच्या उमेदवार फिरोजाबी सिकंदर राणा यांना भाजपच्या माया घुळे यांनी ५२७१ मतांनी पराभूत केले होते. अकोट नगरपालिकेत भाजपनंतर एमआयएमचे सर्वाधिक ५ नगरसेवक विजयी झालेयेत. विधानसभेत 'बटेंगे तो कटेंगे'चा नारा नारा देणाऱ्या भाजपने अकोटमध्ये थेट 'एमआयएम'शी आघाडी केल्याने ते विरोधकाच्या टिकेला कसे उत्तर देणार हे पाहणे औत्सुक्याचे ठरणारेय.

## आष्टी मतदारसंघातील...

होणार आहे.. आष्टी पाटोदा आणि शिरूर (कासार) तालुक्यातील सर्व प्रलंबित कामे सुरू होऊन मजुरांना रोजगार उपलब्ध होणार आहेच आम्ही लाभार्थी शेतकरी आणि मजुरांच्या रोजगाराची संपूर्ण व्यवस्था केली असल्यामुळे विरोधकांनी आंदोलन करण्याची भाषा करून स्टंटबाजी करू नये असे प्रतिपादन आ.सुरेश धस यांनी केले

याबाबत अधिक माहिती देताना ते म्हणाले की, मध्यंतरी आष्टी पाटोदा

◆ पान ९ वरून पुढे...

आणि शिरूर पंचायत समिती आणि तहसील कार्यालयामध्ये रोजगार हमी योजने विषयक आढावा बैठका घेऊन संपूर्ण योजनेविषयी ची माहिती घेतली आहे जुनी भरमसाठ कामे मंजूर आहेत त्यातील अनेक नियम बाह्य आहेत ही नियमबाह्य कामे रद्द करून नियमानुसार लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळणे आवश्यक असल्यामुळे नियमानुसार असलेली अपूर्ण कामे अगोदर प्राधान्याने पूर्ण करावे याची असून सर्व कामांना सुरुवात करण्यात येणार आहे प्राधान्याने ज्या कामांचे एक मास्टर भरले आहे ते अगोदर सुरुवात करून त्यानंतर ज्याचे दोन-तीन मस्टर भरले आहेत ती कामे पूर्ण करण्यात येणार आहेत ही कामे पूर्ण झाल्यानंतरच नवीन कामांना सुरुवात करण्यात येणार आहे संबंधित यंत्रणेतील रोजगार सेवक पीटीओ तांत्रिक अधिकारी या कर्मचाऱ्यांनी कोणत्याही लाभार्थ्याला आर्थिक त्रास देण्याचा प्रयत्न केल्यास कोणाचीही गय केली जाणार नाही त्यांची जिल्ह्याबाहेर बदली करण्यात येईल असा इशारा देऊन लाभार्थ्यांनी अशी मागणी झाल्यास तात्काळ माहिती द्यावी असेही ते म्हणाल रोजगार हमी योजनेतील महत्त्वाचा घटक असलेला रोजगार सेवक हा सरपंचापेक्षा मोठा समजायला लागलेला असून द्वितीय रोजगार सेवकाचे आयडी पासवर्ड मस्टर हजेरी येथील विसंगती दिसून आली आहे त्यामुळे ग्रामपंचायत स्तरावर काम मागणी अर्ज ऑनलाईन मस्टर वेज लिस्ट आणि ॲक्टिव्ह प्रक्रिया सुसूत्रपणे राबवण्याचे स्पष्टपणे सांगण्यात आले असून अनुसूचित जाती जमाती बचत गट आणि विधवा महिलांसाठी शेळी पालन शेड उभारणी ही कामे देखील प्राधान्याने करण्यात येणार आहेत नव्याने विरोधक निर्माण झालेले मजूरांच्या रोजगारासाठी आंदोलनाची भाषा करत आहेत ही स्टंटबाजी करण्याची आवश्यकता राहिलेली नसून सर्व कामे सुरळीत लवकरच होणार आहेत हे माहिती झाल्यामुळेच आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे असे असेही त्यांनी शेवटी म्हटले

## चंदन चोरांची...

आढळून आले. यावेळी दोन लाख साठ हजार रुपये रुपये किमतीचे १०४ किलो लाकूड , ३९ हजार रुपये किमतीची चंदन साल ३९ किलो,टाटा इंडिगो चारचाकी कार ,दुचाकी वाहने अंदाजे एक लाख ६० हजार रुपये एक विनानंबर दुचाकी वीस हजार रुपयांची, ७ मोबाईल फोन लोखंडी तराजू व वाकस १ हजार रुपये असा एकुण मुद्देमाल ८ लाख २१ हजार रुपये पंचांसमक्ष जप्त करण्यात आला.या प्रकरणी पोलीस अंमलदार सतेश कांगणे यांच्या फिर्यादीवरुन आरोपींविरुद्ध परळी ग्रामीण पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२), ३१७(२), ३(५) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. दरम्यान ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके, सहा.पोलीस अधीक्षक ऋषीकेश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली अंबाजोगाई ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक असद शेख परळी ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक निमोने, पोह. बासर, बिक्कड उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयातील सतेश कांगणे, सोडगीर, उत्तरेश्वर केदार, खंदारे यांनी केली आहे.

◆ पान ४ वरून पुढे...

## लोकशाही पत्रकार...

प्रतापराव साळुंखे पाटील सिल्लोड येथील उपस्थित असलेल्या नीलफोर शेख मॅडम वसीम आझाद अनिश कुरेशी संपादक घाडगे मॅडम संपादक संदीप बेद्रे लोकशाचे पत्रकार अभिजीत नखाते मराठवाडा नेता दत्तात्रेय नरनाळे आत्माराम जी वाहळकर साहेब माजी नगरसेवक बाबुराव परळकर अलकाबाई डावकर एडवोकेट गोविंद शिराळे साहेब डॉक्टर उर्मिला घोडके प्रेस फोटोग्राफर कृष्णा शिंदे अविनाश कुलकर्णी संजय देवा कुलकर्णी कुक्कडगावकर पत्रकार दैनिक न्याय टाइम्स तसेच पत्रकार किशोर कुलकर्णी पत्रकार प्रकाश गाडे पत्रकार व सामाजिक कार्यकर्ते लेक लाडकी अभियानाचे बाजीराव ढाकणे गोरख मुंडे व जयश्री माने मॅडम व लोकशाही पत्रकार संघाच्या आरोग्य समिती बीड जिल्हा मार्गदर्शिका व डॉक्टर राजकन्या मुंडे मॅडम तसेच लोकशाही पत्रकार संघाच्या बीड जिल्हा आरोग्य समिती सल्लागार रोशनी शिंदे मॅडम साक्षी सोनवणे मॅडम तेजस्विनी दहिफळे मॅडम जयश्री बस्ते मॅडम लोकशाही पत्रकार संघाच्या पिंपळनेर सर्कलच्या मनीषा देवडकर मॅडम आष्टी येथील पत्रकार अण्णासाहेब साबळे बीड जिल्हा रुग्णालयातील डॉक्टर तांदळे सर राजु अंडागळे संपादक लक्ष्मण गायकवाड पत्रकार नितीन जोगदंड गायकवाड दत्ता बनकर संपादक साप्ताहिक समीकरण वार्ताच्या मुख्य संपादिका शारदाताई डूलगच व सविता जैन मॅडम इमानदार पत्रकार तसेच महाराष्ट्र मराठवाड्यातील व बीड जिल्ह्यातील सर्व पत्रकार समाजसेवक या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने उपस्थित होते सर्वांनी आपापला सन्मान स्वीकारून आयोजकाचे या ठिकाणी केलेल्या उत्कृष्ट कार्याचे कौतुक केले फॉरेस्ट ऑफिसच्या ससाने मॅडम यांचा देखील सन्मानपत्र देऊन त्या सध्या वन विभागाच्या उत्कृष्ट कार्याच्या बाबतीत करत असलेल्या कार्याबद्दल सर्वांनी समाधान व्यक्त करून त्यांनाही सन्मानपत्र दिले तसेच या कार्यक्रमाचे उत्कृष्ट असे सूत्रसंचालन लोकशाही पत्रकार संघाचे मराठवाडा विभागाचे अध्यक्ष आत्माराम जी वावळकर सर यांनी केले उपस्थित मान्यवरांचे व सर्व पत्रकारांचे सर्वांचे त्यांनी मन जिंकले आपल्या मंजुळ अशा गोड अशा आवाजाने सर्वांचे मन जिंकले व हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात आणि आनंदाच्या वातावरणामध्ये सोमेश्वर महादेव मंदिर फाउंडेशन या ठिकाणी संपन्न झाला जिव्हाळा या ठिकाणी असलेल्या अनाथ आई-वडिलांच्या आई वडिलांच्या जीवाची काळजी घेणाऱ्या छायाताई सर्व दे तसेच राजू जोगदंड अभिजीत वैद्य साहेब यांच्या देखील फाउंडेशनच्या पत्रकार संघाच्या वतीने सन्मानपत्र देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले.

◆ पान ४ वरून पुढे...

## 54 रक्तदात्यांनी...

उपाध्यक्ष जावेद पठाण, सचिव गहिनीनाथ पाचबैल, ज्येष्ठ पत्रकार राजेंद्र लाड, निसार शेख, किशोर निकाळजे,अक्षय विधाते, संतोष नागरगोजे, समीर शेख, सोपान पगारे, प्रेम पवळ, अतुल जवणे, मारूती सत्रे, आदिनाथ ठोंबरे, ओंकार कदम, संस्कार लाड यांनी संघटनात्मक काम पार पाडले. साईसेवा ब्लड सेंटरचे संचालक अजित जगताप, डॉ. बांगर, परिचारिका पायल वैद्य, जमुना उगले, प्रतिक्षा मदनकर, रागिनी टेभुरकर,पियुष खेबडे,निकिता मोरे,मनिषा सामृतवार,यांनी तांत्रिक बाजू सांभाळली.संपूर्ण कार्यक्रम सुव्यवस्थित पार पडल्याने दर्पण दिन सामाजिक कार्याद्वारे साजरा करण्याचा संघाचा हेतू सफल ठरला.

## निर्भीड आणि...

ढेपे यांबरोबरच महाविद्यालयातील प्राध्यापक प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थ्यांची उपस्थिती मोठ्या संख्येने होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार डॉ. विठ्ठल केदारी यांनी मानले.

## लिंबागणेश ग्रामपंचायत...

कार्यक्रमास माजी पंचायत समिती सदस्य राजेभाऊ आप्पा गिरे, ॲड. गणेश वाणी, माजी उपसरपंच शंकर वाणी, ग्रामपंचायत सदस्य श्रीहरी निर्मळ, दामोदर थोरात, रमेश गायकवाड, सर्पमित्र अशोक जाधव, जीवन मुळे, सुरेश निर्मळ, सचिन आगवान, रवी वायभट, अंकुश गायकवाड, रामचंद्र मुळे, तुकाराम गायकवाड, संजय पावले, मोहन कोटुळे, नवनाथ मुळे यांच्यासह अनेक ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन डॉ. गणेश ढवळे यांनी केले, तर आभारप्रदर्शन गणपत तागड यांनी केले. दर्पणमधून समाजाला दिशा देण्याचे कार्य : डॉ. गणेश ढवळे- यावेळी बोलताना सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे म्हणाले,पत्रकार दिन हा केवळ शुभेच्छांचा सोहळा नसून समाजाच्या आरशात उभ्या असलेल्या पत्रकारितेच्या दीर्घ, संघर्षमय व प्रेरणादायी प्रवासाचा मागोवा घेण्याचा दिवस आहे. आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी 'दर्पण' वृत्तपत्रातून समाजाला दिशा दिली, तसेच 'दिग्दर्शन' मासिकातून सामाजिक प्रबोधन घडवून आणले.

## माजलगाव नगरपालिकेत...

त्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला आहे. तसेच सुंदरराव सोळंके महाविद्यालय, माजलगाव येथे स्थायी समिती सदस्य म्हणून कार्यरत असताना विद्यार्थी,

◆ पान ४ वरून पुढे...

पालक व शिक्षकांच्या अडचणी सोडवण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. २०२५ मध्ये होणाऱ्या माजलगाव नगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवाजी सुतार यांना स्वीकृत सदस्य म्हणून संधी देण्यात यावी, अशी मागणी नगराध्यक्षांकडे लेखी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. समाजातील विविध घटकांकडून त्यांना मोठ्या प्रमाणावर पाठिंबा मिळत असून मातंग व दलित समाजासह सर्वसामान्य नागरिकांमध्ये त्यांच्याबाबत विश्वासाचे वातावरण असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. शिवाजी सुतार यांना स्वीकृत सदस्य म्हणून संधी मिळाल्यास माजलगाव शहराच्या सर्वांगीण विकासासाठी तसेच वंचित घटकांच्या समस्या मार्गी लावण्यासाठी ते निश्चितच भरीव योगदान देतील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

## आष्टी तालुका...

पार पाडण्याचा प्रयत्न केला जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. उपाध्यक्ष मनोज पोकळे व शरद रेडेकर यांनी संघटनेत सर्व पत्रकारांना सोबत घेऊन एकसंघपणे काम करण्याचा निर्धार व्यक्त केला. सचिव विनोद ढोबळे यांनी संघाच्या कामकाजात पारदर्शकता ठेवून पत्रकारांसाठी प्रशिक्षण, मार्गदर्शन व विविध उपक्रम राबवले जातील, असे स्पष्ट केले. तर कार्याध्यक्ष भीमराव गुरव यांनी संघ अधिक सक्रिय, सक्षम व प्रभावी करण्यासाठी प्रयत्नशील राहण्याची ग्वाही दिली. या बैठकीत तालुक्यातील पत्रकारितेची गुणवत्ता वाढवणे, नवोदित पत्रकारांना मार्गदर्शन करणे, सामाजिक प्रश्नांवर प्रभावी लेखन करणे, तसेच पत्रकारांच्या एकजुटीला बळकटी देणे, याबाबत सखोल चर्चा करण्यात आली. या वेळी शरद तळेकर, रघुनाथ कर्डिले, गणेश दळवी, सचिन रानडे यांच्यासह पत्रकार बांधव उपस्थित होते. नव्या कार्यकारिणीच्या निवडीमुळे आष्टी तालुका पत्रकार संघ अधिक सक्षम होऊन पत्रकारांच्या हितासाठी भक्कमपणे कार्य करेल, अशी भावना उपस्थित पत्रकारांनी व्यक्त के

## माजलगावची पत्रकारिता...

सादर करून कार्यक्रमाची सुरूवात झाली. कै. बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमापुजन व दिपप्रज्वलन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. पुढे बोलतांना आ. सोळंके म्हणाले की, कै. बाळशास्त्री जांभेकर यांनी १८३२ साली सुरू केलेले दर्पण हे पहिले मराठी वृत्तपत्र केवळ बातम्यांचे माध्यम नव्हते, तर समाजप्रबोधन, सत्यनिष्ठा, निर्भिड लेखन व सामाजिक जागृतीचे प्रभावी साधन होत. इंग्रजी सत्ताकाळातही त्यांनी विवेकवादी विचार, विज्ञाननिष्ठा आणि समाजसुधारणेचा पाया पत्रकारितेमधून घातला.

◆ पान ४ वरून पुढे...

हीच परंपरा माजलगाव पत्रकार संघाने पुढे नेत पत्रकारिता आणि समाजकार्य अधिक भक्कम होवो असे सांगीतले तर मा. आ. बाजीराव जगताप म्हणाले की, आजच्या धकाधकीच्या जिवनात भौतिक सुखांच्या मागे धावत असतांना माणूस आपल्या जन्मदात्या आई - वडिलांना विसरतो आहे. ही अत्यंत दुर्देवी बाब आहे. ज्यांनी आपल्यासाठी आयुष्य खर्ची घातले, आपल्याला घडवले, संस्कार दिले. त्या वृध्द मात्या - पित्यांकडे ओझे म्हणून पाहणे हा घोर आपराध आहे. आई - वडील हेच आपले खरे तिर्थक्षेत्र असुन त्यांच्या चरणाची सेवा करणे म्हणजेच खरी तिर्थयात्रा आहे असे सांगीतले. बाबुराव पोटभरे म्हणाले की, जांभेकरांना अभिप्रेत असणारी पत्रकारिता माजलगावातील पत्रकार करतात. ओमप्रकाश शेटे म्हणाले की, तालुक्यातील पत्रकारांच्या गृहनिर्माण सोसायटीचा प्रश्न लवकरच मार्गी लावणार, नुतन नगराध्यक्षा शिफा चाउस म्हणाल्या की, शहरवासीयांच्या मुलभूत प्रश्नांची सोडवणूक करणे हे माझे कर्तव्य आहे तर समाजभुषण पुरस्कार मिळाल्याचा मनस्वी आनंद असल्याचे मंगलाताई सोळंके यांनी सांगीतले. कार्यक्रमास ओमप्रकाश मालपाणी, कल्याण आबुज, उपसभापती श्रीहरी मोरे, शेख मुख्तार, लक्ष्मीकांत देशमुख, शरद यादव, जिवन जगताप, रामभाउ जगताप, बंडु खांडेकर, कचरू खळगे, एकनाथ मस्के, राहुल जगताप, सुरेंद्र रेदासणी, गणेश लोहिया, विनायक रत्नपारखी, दत्ता महाजन, अमरनाथ खुर्पे, अविनाश गोंडे, संपादक रामानंद लड्डा, संपादक सुहास देशमुख, सुरेंद्र जोशी, प्रभाकर शेटे, अच्युत लाटे, राजेश मेंडके, अमर साळवे, किसन भदर्गे, विष्णु उगले, तानाजी सिरसट, परमेश्वर सोळंके संतोष रासवे अनिकेत भिलेगावकर, दर्शन डोंगरे, सौ. गौरी देशमुख, ॲड. सुलभा देशमुख, सौ. राधा येवले, सौ. संगीता मोगरेकर, सौ. कल्याणी जाब्रस, रेखा अंबुरे, अरूणा मस्के, अंजली मस्के यांचेसह जिजामाता नर्सिंग कॉलेज, सिंदफणा पब्लिक स्कुल यांचेसह विद्यार्थी, विद्यार्थीनी, वकील, डॉक्टर, प्राध्यापक, व्यापारी, शिक्षक, सामान्य नागरिक यांचेसह सर्वच क्षेत्रातील मान्यवर व पत्रकार प्रेमींची उपस्थिती होती. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संतोष मुळी, कमलेश जाब्रस, दत्ता येवले, दिनकर शिंदे, महेंद्र मस्के, धनंजय माने, प्रसाद खोले, पांडुरंग कुलथे, अरबाज खान, दिगंबर सपकाळ यांचेसह पत्रकार मित्रांनी पुढाकार घेतला. यांचा झाला सन्मान- माजलगाव पत्रकार संघाच्या वतीने यंदाचा दर्पण पुरस्कार जेष्ठ पत्रकार सुधाकर देशमुख, माजलगाव भुषण मा. आ. बाजीराव जगताप, समाजभुषण मंगलाताई सोळंके तर यशस्वी उद्योजक म्हणुन शेख अब्दुल सत्तार तर विशेष सत्कार नुतन नगराध्यक्षा शिफा बिलाल चाउस यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते मानपत्र, सन्मानचिन्ह, हार, पुष्पगुच्छ व शाल देउन सन्मान करण्यात आला.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
**हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे,** E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# पत्रकार दिन: जिल्हा माहिती कार्यालयात बाळशास्त्री जांभेकरांना अभिवादन

# चौथा स्तंभ म्हणून माध्यमांचे योगदान अमूल्य: प्रशांत दैठणकर



**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

आपल्या देशाच्या लोकशाहीच्या अन्य तीन स्तंभांवर प्रहरी म्हणून लक्ष ठेवून माध्यमांनी लोकशाही बळकट करण्यासाठी अमूल्य योगदान दिले आहे, असे प्रतिपादन प्रभारी उपसंचालक प्रशांत दैठणकर यांनी आज येथे केले.

जिल्हा माहिती कार्यालयात समिती सभागृहात पत्रकार दिनानिमित्त आज विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. प्रभारी उपसंचालक प्रशांत दैठणकर यांच्या हस्ते आद्यपत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पुष्पहार अर्पण करुन पूजन करण्यात आले. जिल्हा माहिती अधिकारी डॉ.मिलिंद दुसाने, ज्येष्ठ पत्रकार डॉ.रामभाऊ अग्रवाल, जिल्हा परिषदेचे जनसंपर्क अधिकारी सतिष औरंगाबादकर, किशोर महाजन, अब्दुल गनी शेख, राजू वाघमारे, रतन साळवे, रामनारायण जोशी, सईद शेख, वाय. के. नारायणपूरकर, सुरेश क्षीरसागर, नदीम सौदागर, विजय अवसरमल, कल्याण अन्नपूर्णे, सतिष जाधव, सुरेश साळवे, डॉ. शेख अफसर, राजेश सोनवणे, जकी नवाब पटेल, सुजित ताजने, आदी मान्यवर पत्रकार उपस्थित होते. याप्रसंगी सर्व उपस्थित पत्रकारांचे गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आले. त्यानंतर उपस्थितांनी आपलेमनोगत व्यक्त केले. राजू वाघमारे यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जिल्हा माहिती कार्यालयाचे अनिल परदेशी, स्वाती शार्दूल, मंजूश्री मुळे, सतिष वाबळे, सागर दांडगे, मोहसिन मन्सूरी, चंद्रकला दाभाडे, संजय दीक्षित आदींनी परिश्रम घेतले.

## महाराष्ट्र ग्रामसामाजिक परिवर्तन अभियान; गांधेली येथे वृक्ष लागवड कामांची पाहणी

**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

गांधेली ग्रामपंचायत अंतर्गत साई टेकडी परिसरात महाराष्ट्र ग्राम सामाजिक परिवर्तन फाउंडेशन (चतडढक्र) मार्फत केलेल्या एक लक्ष ४५ हजार वृक्ष लागवड व जलसंधारण उपक्रमांची पाहणी आज (दि.५) करण्यात आली. गट विकास अधिकारी श्रीमती मिना रावतळे यांनी ही पाहणी केली.

या अंतर्गत साई टेकडी परिसरात वृक्ष लागवड, रोपांची गुणवत्ता, वाढ व दीर्घकालीन टिकाव, सिंचन, संरक्षण व नियमित देखभाल व्यवस्था, जलसंधारणाची विविध कामे व त्यांचा भूजलस्तरावर होणारा सकारात्मक परिणाम, ग्रामपंचायत गांधेली व स्थानिक समुदायाचा सक्रिय सहभाग यासह उपक्रमाच्या नियोजन, अंमलबजावणी व प्रत्यक्ष परिणामांचा सविस्तर आढावा



घेण्यात आला.

या उपक्रमामुळे साई टेकडी परिसरात हरित आच्छादनात लक्षणीय वाढ, पर्यावरणीय संतुलन, तसेच पर्यटन स्थळाच्या नैसर्गिक सौंदर्यात भर पडत आहे. वृक्षलागवड आणि जलसंधारणाचा समन्वय हा शाश्वत पर्यावरणीय व पर्यटन विकासाचा आदर्श नमुना ठरत आहे. जिल्हा प्रशासन, महाराष्ट्र ग्राम सामाजिक परिवर्तन फाउंडेशन (चतडढक्र) व ग्रामपंचायत यांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे पर्यावरण संवर्धन, जलसुरक्षा, जैवविविधता संरक्षण आणि स्थानिक विकास य्चे दृष्य परिणाम दिसत आहेत.पाहणी दरम्यान कृषी अधिकारी दिनकर जाधव, विस्तार अधिकारी सोळशे, सरपंच मन्नू शेख, ग्रामपंचायत अधिकारी सलोनी खरात, अभियान सहयोगी दयानंद माने, जिल्हा कार्यक्रम समन्वयक किरण बिलोरे, प्रकल्प समन्वयक सतीश खंदारे, अमोल कुटे, रवी वाघमोडे, जलदूत महेश तळेकर यांच्यासह ग्रामपंचायत पदाधिकारी व इतर कर्मचारी उपस्थित होते.

## आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांना अभिवादन

**जालना । प्रतिनिधी**



आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त जिल्हा माहिती कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात जिल्हा माहिती अधिकारी अरुण सुर्यवंशी यांनी आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. यावेळी जेष्ठ पत्रकार, संपादक, प्रतिनिधी यांच्यासह जिल्हा माहिती कार्यालयातील अधिकारी–कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.

## देवडी फाटा जि.प.शाळेच प्रोजेक्टर भेट

**वडवणी । प्रतिनिधी**



तालुक्यातील देवडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा देवडी फाटा येथे थोर समाजसुधारिका व पहिल्या महिला शिक्षिका क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली.या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे माजी विद्यार्थी संघ मेळावा आणि मेळाव्यात माजी विद्यार्थी तसेच आदर्श मॉल बीड चे संचालक एकनाथ झाटे व गावकर्यांनी शाळेस प्रोजेक्टरची दिलेली भेट देण्यात आली.

यावेळी विद्यार्थ्यांनी सावित्रीबाईंच्या जीवनकार्यावर भाषणे, कविता व विचार मांडले. शिक्षकांनी त्यांच्या शैक्षणिक कार्याचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले.

या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे माजी विद्यार्थी संघ मेळावा आणि मेळाव्यात माजी विद्यार्थी तसेच आदर्श मॉल बीड चे संचालक श्री एकनाथ झाटे व गावकर्यांनी शाळेस प्रोजेक्टरची दिलेली भेट .या उपक्रमामुळे डिजिटल शिक्षणाला चालना मिळणार असून विद्यार्थ्यांच्या अध्ययनात अधिक प्रभावी बदल घडून येणार आहे. गावकर्यांनी शाळेच्या शैक्षणिक प्रगतीसाठी नेहमीच सहकार्य करण्याची भावना व्यक्त केली. शाळेच्या वतीने गावकर्यांचे आभार मानण्यात आले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, विद्यार्थी व ग्रामस्थांचे मोलाचे सहकार्य लाभले.

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेच्या विद्यार्थ्यांना आवाहन

**जालना । प्रतिनिधी**

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ योजनेचे अर्ज ऑनलाईन पद्धतीने https://hmas.mahait.org/ या संकेतस्थळावर दिनांक ३१ डिसेबर २०२५ पर्यंत स्विकारण्यात आलेले होते. सन २०२५-२६ या वर्षासाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचे ऑनलाईन भरलेले अर्ज विद्यार्थ्यांनी दि. ८ ते १६ जानेवारी २०२६ पर्यंत सकाळी १०.३० ते ४.३० पर्यंत सहायक आयुक्त, समाज कल्याण जालना या कार्यालयात जमा करावेत, असे आवाहन समाज कल्याणचे सहायक आयुक्त राजु एडके यांनी केले आहे.

## मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने मराठी पत्रकार दर्पण दिन साजरा

**बीड । प्रतिनिधी**



महाराष्ट्रात ६ जानेवारी हा दिवस 'मराठी पत्रकार दिन' म्हणून मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येतो. त्याचप्रमाणे मराठी पत्रकार परिषद बीड शाखेच्या वतीने दैनिक लोकतंत्र कार्यालयात दर्पण दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त त्यांच्या कामगिरीचा सन्मान करण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो. आजच्या दिवशी १८३२ मध्ये त्यांनी दर्पण हे वृत्तपत्र सुरु करत मराठी पत्रकारितेचा पाया रचला होता, ज्यामुळे इतिहासात मराठी पत्रकारितेचे नवे पर्व सुरु झाले. मराठी पत्रकारितेचा मुहूर्तवेढ रोवणारे महापुरुष आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी जन्म २० फेब्रुवारी १८१२ मध्ये एका सामान्य कुटुंबात त्यांचा जन्म झाला होता. त्यांनी आपले शिक्षण गावात पुर्ण केले आणि नंतर मुंबई येथे उच्च शिक्षणासाठी आहे. त्यांचे उच्च शिक्षण बॉम्बे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या विद्यालयात पूर्ण झाले आहे. येथेच त्यांना त्यांची विद्वत्ता लक्षात आली. त्यांनी अगदी लहान वयातच प्राध्यापक म्हणून आपल्या करियरची सुरुवात केली. त्यांच्या विचारांनी, कार्यानी समाजात प्रबोधन घडवून आणण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. त्यानंतर त्यांनी ६ जानेवारी १८३२ रोजी दर्पण नावाचे पहिले मराठी नावाचे वृत्तपत्र सुरू केले. यावेळी ज्येष्ठ पत्रकार प्रमोद कुलकर्णी उपस्थित होते. त्यांच्या हस्ते बाळशास्त्री जांभेकरांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना पुष्पहार अर्पण करण्यात आला. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी बीड शहरांमध्ये मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने दर्पण दिन साजरा करण्यात आला .या निमित्ताने विचाराची देवाण-घेवाण झाली. या कार्यक्रमाला मराठी पत्रकार परिषदेचे संभाजीनगरचे सचिव रवी उबाळे, विभागीय समन्वयक सुभाष चौरे, जिल्हाध्यक्ष विशाल साळुंके, संपादक संजय मालानी, संपादक तथा मराठी पत्रकार परिषदेचे प्रसिद्धी प्रमुख संजय हांगे, संपादक तथा मराठी पत्रकार परिषदेचे हल्लाविरोधी कृती समितीचे समन्वयक अभिमन्यू धरत,तालुका समन्वयक मंगेश निटुरकर, अनिल अष्टपुत्रे, दिलीप शिंगाडे आदींची उपस्थिती होती.

# पोलीस अधिक्षक नवनीत कॉंवत यांनी दिला विद्यार्थ्यांना शिस्त, सुरक्षितता आणि स्वप्नांचा मंत्र

**● एस.पी.ऑफिस येथे विद्यार्थ्यांसाठी कार्यशाळा संपन्न**

**बीड । प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, आत्मविश्वास, कायद्याची जाणीव आणि उज्ज्वल भविष्यासाठी योग्य दिशा निर्माण करण्याच्या उद्देशाने पोलीस अधिक्षक नवनीत कॉंवत व अप्पर पोलीस अधिक्षक सचिन पांडकर आणि प्रशिक्षणार्थी आयपीएस राहुल कुमार यांच्या उपस्थितीत पोलीस वर्धापन दिनानिमित्त विद्यार्थ्यांसाठी विशेष मार्गदर्शन कार्यशाळा पोलीस अधिक्षक कार्यालय, बीड या ठिकाणी संपन्न झाली. या कार्यशाळेत पोलीस अधिक्षकांनी विद्यार्थ्यांसोबत थेट संवाद साधत शिक्षणासोबतच शिस्त, जबाबदारी, निर्व्यसनी राहणे, सोशल मिडीयाचा योग्य वापर कसा करावा याची माहिती दिली. सदरील कार्यशाळेमध्ये श्री.शिवाजी विद्यालय व संस्कार विद्यालयाचे विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. यावेळी पोलीस



अधिक्षक यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना सांगितले की, चुकीच्या एका क्लिकमुळे संपुर्ण आयुष्य डिस्टर्ब होवून जाते तुम्ही आजचे विद्यार्थी हे उद्याचे देशाचे भवितव्य आहात त्यामुळे तुम्ही जीवनात असे ज्ञान प्राप्त करा की त्याचा तुम्हाला आणि समाजाला व देशाला लाभ झाला पाहिजे. त्यानंतर पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर व पोलीस हवालदार बाळासाहेब नागरगोजे यांनी विद्यार्थ्यांना पोलीस नियंत्रण कक्ष येथे पोलीस निरीक्षक सोमनाथ जाधव, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड, सायबर शाखेचे पोलीस निरीक्षक संदीप अराक, अनैतिक मानवी प्रतिबंधक शाखेचे पोलीस उपनिरीक्षक पल्लवी जाधव, दहशतवादी विरोधी पथक पीएसआय शेखर औटे , जिल्हा विशेष शाखेचे पोलिस निरीक्षक मुकूंद कुलकर्णी , जिल्हा वाहतुक शाखेचे सपोनि सुभाष सानप येथे प्रत्यक्ष दर्शनीस्थळी नेवून संबंधित विभागाचे प्रभारी अधिकारी यांच्यासोबत संवाद साधून दिला.

## कऱ्हेवडगाव येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात साजरी

**आष्टी । प्रतिनिधी**

ज्ञान ज्योती थोर समाज सुधारक महिलांना शिक्षणाचा हक्क मिळून देणाऱ्या सावित्रीबाई फुले यांची जयंती कऱ्हेवडगाव येथील जि. प. प्रा. शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व खाऊचे वाटप करून उत्साहामध्ये साजरी करण्यात आली.

जयंती कार्यक्रमाचे नियोजन शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष श्री. गणेश टकले उपाध्यक्ष श्री. महेश कांतीलाल सांगळे व समितीचे सर्व सदस्य यांनी केले . कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेचे मुख्याध्यापक श्री. राजेंद्र पवार सर व श्री. वाघमारे सर यांनी केले.




सावित्रीबाई फुले यांच्या जीवन प्रवासावर आधारित शाळेतील विद्यार्थी विद्यार्थीनी यांच्या कडून भाषणाची पुर्व तयारी श्रीमती. पवार मॅडम यांनी केली. यावेळी जालिंदर गायकवाड नेते ,जालिंदर विधाते, रावसाहेब वांढरे, शामराव खांडवे, विलास नागरगोजे, शरद खांडवे, हनुमान गायकवाड, प्रविण गायकवाड ,शंकर नागरगोजे किरण बांगर, दादासाहेब नागरगोजे ,अजित विधाते ,विजय विधाते, विकास विधाते, गोकुळ खाडे, लक्ष्मण टकले, प्रशांत बांगर, मनोहर खाडे, सतिष नागरगोजे, विकास गायकवाड, अदी ग्रामस्थ व विद्यार्थी उपस्थित होते.

## क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात साजरी

**आष्टी । प्रतिनिधी**

थोर समाजसुधारक , स्त्री शिक्षणाच्या आद्य प्रनेत्या सावित्रीबाई फुले यांची जयंती आष्टी शहरात महिलांनी एकत्रित येत मोठ्या उत्साहात साजरी केली. शहरातील क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले चौकात क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त विविध सामाजिक शैक्षणिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

सकाळी १० वाजता युवा नेते जयदत्त धस ,युवक नेते अभय राजे धोंडे, जिल्हा परिषद सदस्य सतीश आबा शिंदे , उद्योजक सरपंच राधेश्याम भैय्या धस, उपनगराध्यक्ष शैलेश सहस्त्रबुद्धे, माजी नगराध्यक्ष रंगनाथ धोंडे, नगरसेवक सुनील रेडेकर, सरपंच अशोक मुळे, अजित मुळे, ज्येष्ठ पत्रकार उत्तम बोडखे, ज्येष्ठ पत्रकार प्रफुल भाऊ सहस्त्रबुद्धे, माजी शिक्षणाधिकारी विक्रम पोकळे, माजी पंचायत समिती सभापती आदिनाथ सानप माजी, सरपंच संतोष भैय्या



चव्हाण, मुख्याध्यापक अशोक धोंडे सर आदी मान्यवरांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले. सायंकाळी पाच वाजता वकृत्व स्पर्धांचे आयोजन करण्यात आले या स्पर्धेत पायल मुळे, भूमिका वाघमारे, धोंडे कविता सोनटक्के, वैशाली धोंडे, ऋतुजा लटपटे, जागृती धोंडे, ज्ञानेश्वरी तावरे, गायत्री चव्हाण, कादंबरी निकाळजे, ज्ञानेश्वर नाईक, मानसी डुकरे, भक्ती गीते, स्नेहल धोंडे योगिता घुमरे, राजश्री गर्जे, साक्षी गायकवाड, प्रतिक्षा पवार, गौरी डुकरे ,मुस्कान शेख, वैष्णवी डोके आदी विद्यार्थ्यांनी प्रभावी व अभ्यासपूर्ण भाषणे सादर करून उपस्थितांची मने जिंकली यावेळी मराठा सेवा संघाच्या विभागीय अध्यक्षा सुवर्णाताई गिऱ्ही, विद्याताई चव्हाण, सौ बबीता बोडखे, संत सावता क्रांती सेना विभागीय प्रमुख वर्षाताई शिंदे,शिक्षिका मंगल झगडे, आशाताई धोंडे, श्री स्वामी समर्थ प्रायमरीस शाळेचे संचालिका ज्योती प्रदीप धोंडे, सियाज प्री स्कूलच्या संचालिका आष्टी प्रा. इंजि प्रियंका सचिन विधाते, पोर्णिमा निकाळजे, धोंडे ताई यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते व या स्पर्धे चे परीक्षण ह.भ.प श्रीहरी पुरी महाराज ह भ प सोनाजी महाराज बनकर , श्री धर्मनाथ शिंदे सर तसेच कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री बाळासाहेब बनसोडे यांनी केले या सोबतच शाळेतील विद्यार्थ्यांचे सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आले. सावित्रीबाई फुले यांच्या कार्याची विचारांची ओळख करून देणाऱ्या कार्यक्रमास नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थित लाभली. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले प्रतिष्ठान यांनी परिश्रम घेतले.

प्रथम क्रमांक भक्ती गिरी, द्वितीय क्रमांक कविता सोनटक्के, तृतीय क्रमांक शितल चौधरी, यांनी बक्षीस मिळवली तर ऋतुजा लटपटे, प्रतीक्षा पवार यांना उत्तेजनार्थ बक्षीस देण्यात आले.

प्रथम बक्षीस रंगनाथ धोंडे - ३००१, द्वितीय बक्षीस -२००१ रुपये, तृतीय बक्षीस बबीता बोडखे - १००१ रुपये रोख देण्यात आले.


## जाहिर प्रगटन

**मा. के. सी. माने सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात, बीड, ता.जि. बीड**

**किरकोळ दिवाणी अर्ज कमांक १९६० / २०२५**

CNR No. MHBI02000042582025

**कांताबाई भ्र. महादेव कदम व ईतर ४ वि. निरंक**

**अर्जदार :- १. कांताबाई भ्र. महादेव कदम, वय ६७ वर्षे, धंदा घरकाम, रा. चौदसवाडी ता. जि. बीड २. गोरखनाथ पि. महादेव कदम, वय-४२ वर्षे, धंदा-शेती, रा. चौदसवाडी ता. जि. बीड ३. लहू पि. महादेव कदम, वय-४० वर्षे, धंदा-शेती, रा. चौदसवाडी ता. जि. बीड ४. अंकुश पि. महादेव कदम, वय-४० वर्षे, धंदा-शेती, रा. चौदसवाडी ता. जि. बीड ५. सुनिता भ्र. बालासाहेब ठोंबरे, वय-४५ वर्षे, धंदा-घरकाम, रा. सुर्डी ता. केज जि. बीड**

**विरुद निरंक**

मागणी अर्ज :- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार मयताचे वारस म्हणुन मिळणे बाबत.

वरील अर्जदार क. १ ते ५ यांनी या न्यायालयात महादेव ज्ञानोबा कदम यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी मयत महादेव ज्ञानोबा कदम यांचा मृत्यु दिनांक २२/११/२०२५ रोजी झाला. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात वरील मयताचे वारस असल्या बाबत वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्ज दाखल केला आहे. अर्जदार क. १ ही मयताची पत्नी असून अर्जदार क. २ ते ४ हे मयताचे मुले व अर्जदार क. ५ ही मयताची विवाहीत मुलगी आहे. वरील अर्जदार शिवाय मयताचे इतर कोणीही कायदेशिर वारस नाहीत.

मयत महादेव ज्ञानोबा कदम यांचे मृत्युनंतर वरील अर्जदार यांना शासकीय व निमशासकीय कामाकरीत व ईतर कार्यालयीन उपयोगा करीता सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे सदरहू मयतांचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन तीस दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होवुन आपली हरकत कळवावी. जर मुदतीत कोणीही हरकत न कळविल्यास हे न्यायालय अर्जदारांचे हक्कांत त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयतांचे वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वानी नोंद घ्यावी.

**प्रकरणातील पुढील तारीख २९/०१/२०२६**

आज दिनांक २७ माहे डिसेंबर २०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. **(मार्फत ॲड. एस. डी. घोडके)**

शिक्का | (स्वाक्षरीत) क. लिपीक | आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक सह दिवाणी न्यायालय व. स्तर बीड

## जाहिर प्रगटन

**मा.श्री. रफीक ए. शेख, सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक : १९८४/२०२५**

**अर्जदार :- १. रंजना भ्र. अरुण वाघमारे, वय ३५ वर्षे, धंदा घरकाम, रा. सफेपुर, ता.जि.बीड, २.साक्षी पि. अरुण वाघमारे, वय १९ वर्षे, धंदा शिक्षण, रा. वरीलप्रमाणे, ३. तेजस पि. अरुण वाघमारे, वय १७ वर्षे, धंदा - शिक्षण, रा. वरीलप्रमाणे, अ.पा.क.आई अर्जदार क्र १ रंजना भ्र. अरुण वाघमारे, ४.सागर पि. अरुण वाघमारे, वय १३ वर्षे, धंदा शिक्षण, रा. वरीलप्रमाणे, अ.पा.क. आई अर्जदार क १ रंजना भ्र. अरुण वाघमारे, ५. साहेबा पि. भिमाजी वाघमारे, वय ८० वर्षे, धंदा-शेती, रा. सफेपुर, ता.जि.बीड,**

विरुध्द निरंक

प्रकरण - बॉम्बे रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी **मयत नामे अरुण साहेबा वाघमारे हे / हया दिनांक २७/०४/२०२५ रोजी जिल्हा रुग्णालय बीड, ता.जि.बीड** येथे मयत झालेले असुन अर्जदार क. १ ही मयताची पत्नी आहे. अर्जदार क्र २ ही मयताची मुलगी आहे. अर्जदार क ३ व ४ हे मयताचे अज्ञान मुले आहेत. अर्जदार क्र ५ हे मयताचे वडील आहेत.

अर्जदार शिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत असे अर्जदाराचे म्हणणे आहे.

अर्जदार असेही म्हणणे आहे की, शासकिय व निमशासकीय कार्यालयीन उपयोगा करीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यांत येते की, सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आंत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कांत त्यांचा हक्का बाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याबद्दलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

आज दिनांक:- २४/१२/२०२५ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**पुढील तारीख:- ०९/०२/२०२६.**

**( मार्फत विधिज्ञ:- ॲड एस डी घोडके )**

शिक्का | (स्वाक्षरीत) क. लिपीक | आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय व. स्तर बीड

दैनिक
# मराठवाडा पत्र
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर
● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● बुधवार, दि. ०७ जानेवारी २०२६ ● पान ४



*नर्मदा मातेची परिक्रमा यशस्वी पूर्ण करून आल्याबद्दल ह भ प महंत गुरूवर्य शांतीब्रम्ह नवनाथ महाराज गोरक्षनाथ संस्थान गोरक्षनाथ टेकडी यांनी नगद नारायणगडाचे महंत ह भ प गुरूवर्य प्रेममूर्ती शिवाजी बाबांची भेट घेतली.*

## डोंगरे कुटुंबाला मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून ५ लाख रु. ची मदत जाहीर

## ओमप्रकाश शेटे साहेबांनी भेट घेऊन केले सांत्वन



**वडवणी । प्रतिनिधी**

ऊसतोड कामगार स्व. गणेश डोंगरे यांच्या दुर्दैवी अपघाती निधना मुळे उघड्यावर आलेल्या कुटुंबाला आधार देण्यासाठी काल मा. ओमप्रकाश शेटे अध्यक्ष आयुष्यमान भारत योजना यांनी डोंगरेवाडी येथे कुटुंबाला भेट घेऊन सांत्वन केले. मुख्यमंत्री फडणवीस साहेब यांच्या सूचनेनुसार सहायता फंडातून ५ लाख रु ची मदत जाहीर केली आहे. या वेळी आयुष्मान भारत योजनाचे अध्यक्ष ओमप्रकाश शेटे, तहसीलदार महिंद्रकार, दिनकरराव आंधळे,संजय भाऊ आंधळे, बंडू खांडेकर, भगवान कांदे रुई सरपंच मयूर शेठ आंधळे,कान्हापुर सरपंच ,उतरेश्वर खताळ,गणेश जायभाये सह ग्रामस्थ उपस्थि होते.

## लोकशाही पत्रकार संघ व सोमेश्वर हनुमान मंदिर फाउंडेशन च्या वतीने...

# संपादक दत्तात्रय नरनाळे यांना लोकरत्न पुरस्काराने केले सन्मानित





**बीड । प्रतिनिधी**

बीड येथे बार्शी रोडवरील असलेल्या श्री सोमेश्वर मंदिर या ठिकाणी बाळ शास्त्री जांभेकर यांच्या दर्पण दिनानिमित्त लोकशाही पत्रकार संघ सोमेश्वर महादेव हनुमान मंदिर फाउंडेशन यांच्या वतीने महाराष्ट्रासह मराठवाड्यातील तसेच बीड जिल्ह्यातील संपादक पत्रकार समाजसेवक यांना लोक रत्न पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले यावेळी या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा अधिकारी विवेक जॉनसन साहेब तसेच अध्यक्ष म्हणून बीड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक नवनीत कावत साहेब तसेच उपस्थितीमध्ये प्रमुख उपस्थिती जतीन रहेमान सर तसेच नगर परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी शैलेश फडके सर व बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके साहेब पेठ बीड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक मारुती खेडकर साहेब डॉक्टर घोडके साहेब पाली महसूल विभागाच्या लेडी सिंघम म्हणून प्रसिद्ध असलेल्या मंडळ निरीक्षक लेडी दबंग सिंघम शितल ताई व समाजसेविका मयुरी ताई बांगर समाजसेविका सीमा ओस्तवाल यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

यावेळी सर्व उपस्थित यांचे सोमेश्वर मंदिर महादेव मंदिर फाउंडेशनचे अध्यक्ष तथा लोकशाही पत्रकार संघाचे उपाध्यक्ष नवनाथ जी अण्णा शिरोळे पाटील यांनी सर्वांना सन्मानपत्र देऊन सर्व पत्रकारांच्या व समाजसेवकांच्या उत्कृष्ट कार्याचा गौरव केला व त्यांना पुढील कार्यास भरभरून दिल्या मंदिर समितीच्या वतीनेव पत्रकार संघाचे वतीने शुभेच्छा दिल्या यावेळी येथे उपस्थित असलेले संपादक गंगाधर नाना काळकुटे व लोकशाही पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष बीबी वैद्य साहेब तसेच नाशिक येथून या कार्यक्रमासाठी उपस्थित असलेले धर्मेंद्र कदम जयश्रीताई मस्के, लोकशाही पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष ▶ उर्वरित पान २ वर

### दर्पण दिनानिमित्त आष्टी तालुका युवा पत्रकार संघाच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन

## 54 रक्तदात्यांनी केले रक्तदान

## स्तुत्य उपक्रम राबवून दर्पण दिन उत्साहात साजरा

**आष्टी । प्रतिनिधी**

पत्रकारितेचे जनक' दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीदिनी (६ जानेवारी) 'दर्पण दिन' साजरा करण्याच्या परंपरेअंतर्गत आष्टी तालुका युवा पत्रकार संघाने यावर्षी एक सामाजिक उपक्रम म्हणून रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. गणपती लिमटाका मंदिर, आष्टी येथे आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिरात ५४ जणांनी



रक्तदान करून समाजासाठी उदात्त बांधिलकीचे दर्शन घडवले. हा उपक्रम राबवून संघाने दर्पण दिन उत्साहात साजरा केला.

आष्टी तालुका युवा पत्रकार संघ नेहमीच विविध सामाजिक उपक्रम राबवत असून, ८ मार्च जागतिक महिला दिनानिमित्त 'कर्तृत्वान महिलांचा झुंजार नारी पुरस्कार' देऊन समाजातील प्रेरणादायी महिलांचा सन्मान करतो. त्याचप्रमाणे, दर्पण दिनानिमित्त गेल्या तीन वर्षांपासून समाजासाठी व पत्रकारितेसाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या ज्येष्ठ पत्रकारांचा सन्मान केला जातो. या वर्षी, सामाजिक जागृतीला अधिक चालना देण्याच्या हेतूने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.रक्तदान शिबिर यशस्वी करण्यासाठी अध्यक्ष अविनाश कदम, ▶ उर्वरित पान २ वर

## निर्भीड आणि वस्तुनिष्ठपणे पत्रकारांनी कार्य करावे: ज्येष्ठ पत्रकार श्री. चंद्रकांत देशपांडे

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

निर्भीड व वस्तुनिष्ठपणे समाजासाठी अविरतपणे कार्य करणे पत्रकारांचे कर्तव्य आहे. कोणत्याही दबावाला बळी न पडता समाजातील प्रश्न प्रखरपणे शासन आणि जनतेपर्यंत पोहोचविल्या पाहिजेत असे मत ज्येष्ठ पत्रकार चंद्रकांत देशपांडे यांनी राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये दर्पण दिनानिमित्त आयोजित पत्रकार बंधूंचा सत्कार समारंभामध्ये प्रतिपादन केले. त्यांनी आपल्या व्याख्यानातून पत्रकारिता करत असताना आलेल्या अनुभवांना शब्दांकित केले. तत्कालीन



समस्या, घटना, प्रसंगांतून प्रामाणिकपणे पत्रकारितेचे कार्य उपस्थितांना सांगितले. अध्यक्षीय समारोपातून प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांनी दर्पण दिनाच्या सर्व पत्रकार बांधवांना शुभेच्छा देऊन अभिनंदन केले. १८३२ सालापासून सुरू झालेली पत्रकारिता आज विशिष्ट उंचीवर पोहोचली असून तिला वृद्धिंगत करण्याचे कार्य पत्रकार करतात असे सांगितले. दर्पण दिनानिमित्ताने सर्व पत्रकार बांधवांना ग्रंथ, पेन व गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले. याप्रसंगी पत्रकार राम शेळके यांनी मनोगतातून पत्रकारिता करत असलेल्या अनुभवांचे कथन केले. या सत्कार समारंभासाठी धारूर शहर व परिसरातील अनिल महाजन, अतुल शिनगारे, संदिपान तोंडे, सय्यद शाखेर अली, परमेश्वर राऊत, नाथा ढगे, सूर्यकांत जगताप, अविनाश जगताप, सुभाष साखरे, मनोज जगताप, सुनील कावळे, सतीश पोदार, रवी गायसमुद्रे, सचिन घोडके, प्रदीप साखरे, विश्वास शिनगारे, शुभम शुक्ला, अविनाश ठोंबरे, सुनील तोंडे या पत्रकार बंधूंची सत्कार सोहळ्यास उपस्थिती होती. याप्रसंगी उपप्राचार्य प्रा. महादेव जोगडे, उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड, पर्यवेक्षक प्रा. सच्चिदानंद ▶ उर्वरित पान २ वर

## लिंबागणेश ग्रामपंचायत कार्यालयात दर्पण दिन उत्साहात साजरा : डॉ.गणेश ढवळे



**लिंबागणेश । प्रतिनिधी**

आद्य पत्रकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी दि. ६ जानेवारी १८३२ रोजी सुरू केलेल्या मराठीतील पहिल्या वृत्तपत्र *दर्पण*च्या स्मरणार्थ साजरा होणारा दर्पण दिन आज मंगळवार दि. ०६ जानेवारी रोजी बीड तालुक्यातील लिंबागणेश ग्रामपंचायत कार्यालयात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी मराठी पत्रकारितेचे जनक आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बेलेश्वर संस्थान मठाधिपती शांतीब्रम्ह तुकाराम भारती महाराज होते. प्रमुख पाहुणे म्हणून शिवसेना जिल्हाप्रमुख स्वप्निल भैय्या गलधर, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) जिल्हाध्यक्ष राजेंद्रजी मस्के, मराठा सेवक हनुमान मुळीक आणि तुलसीदास महाराज उपस्थित होते. ▶ उर्वरित पान २ वर

## माजलगाव नगरपालिकेत शिवाजी सुतार यांचा स्वीकृत सदस्य म्हणून समावेश करण्याची मागणी

**माजलगाव । प्रतिनिधी**



माजलगाव नगरपालिकेत समाजसेवेसाठी दीर्घकाळ कार्यरत असलेले शिवाजी भाऊ सुतार यांची नगरपालिकेच्या स्वीकृत सदस्यपदी निवड करण्यात यावी, अशी मागणी शिवाजी सुतार मित्र मंडळ तसेच समस्त मातंग समाजाच्या वतीने करण्यात आली आहे. गेल्या २५ ते ३० वर्षांपासून शिवाजी सुतार हे सामाजिक, शैक्षणिक तसेच दलित व वंचित समाजाच्या हितासाठी सातत्याने कार्यरत आहेत. माजलगाव शहर व परिसरातील सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न सोडवण्यासाठी त्यांनी नेहमीच पुढाकार घेतला असून त्यांच्या कार्याची दखल अनेक मान्यवरांनी घेतली आहे. माजलगावचे माजी नगरसेवक व नगराध्यक्ष यांच्यासोबत विविध सामाजिक उपक्रमांमध्ये ▶ उर्वरित पान २ वर

## आष्टी तालुका पत्रकार संघाची कार्यकारणी जाहीर

### अध्यक्षपदी संतोष सानप तर सचिव पदी विनोद ढोबळे यांचे बिनविरोध निवड

**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी तालुका पत्रकार संघाची सर्वसाधारण बैठक आज दर्पण दिनी उत्साहपूर्ण व सकारात्मक वातावरणात पार पडली. या बैठकीत संघाच्या नव्या कार्यकारिणीची निवड एकमताने करण्यात आली.



या बैठकीत अध्यक्षपदी संतोष सानप, उपाध्यक्षपदी मनोज पोकळे व शरद रेडेकर, सचिवपदी विनोद ढोबळे, तर कार्याध्यक्षपदी भीमराव गुरव यांची बिनविरोध निवड करण्यात आली. नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे उपस्थित पत्रकार बांधवांनी टाळ्यांच्या गजरात अभिनंदन केले. ही निवड प्रक्रिया ज्येष्ठ पत्रकार प्रफुल सहस्त्रबुद्धे, उत्तमराव बोडखे, दत्ता काकडे, सिताराम पोकळे तसेच मावळते अध्यक्ष प्रवीण पोकळे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या वेळी संघाच्या वाटचालीचा आढावा घेत पुढील दिशा व धोरणांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी बोलताना नवनिर्वाचित अध्यक्ष संतोष सानप यांनी सांगितले की, तालुक्यातील पत्रकारांच्या समस्या, अडचणी, हक्क व सुरक्षिततेसाठी पत्रकार संघाच्या माध्यमातून ठामपणे आवाज उठवला जाईल. पत्रकारितेतील नीतिमूल्ये जपून सामाजिक बांधिलकीची भूमिका अधिक सक्षम करण्यासाठी संघ सातत्याने कार्यरत राहील. लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून पत्रकारांची जबाबदारी अधिक प्रभावीपणे ▶ उर्वरित पान २ वर

## दर्पण दिनानिमित्त शालेय साहित्य वाटप;

### मराठी पत्रकार परिषद वडवणी तालुक्याचा उपक्रम

**वडवणी । प्रतिनिधी**

बाळशास्त्री जांभेकर यांनी सुरू केलेले मराठीतील पहिले वर्तमानपत्र दर्पण दर्पण दिनाचे औचित्य साधून मराठी पत्रकार परिषद वडवणी तालुक्याच्या वतीने प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी वडवणी तालुक्यातील कवडगाव येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करून दर्पण दिन साजरा करण्यात आला यावेळी मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस एम देशमुख व डिजिटल मीडियाचे राज्य अध्यक्ष अनिलजी वाघमारे



यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबवण्यात आला यावेळी कवडगाव येथील सरपंच शेख बशीर भाई शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष शेरू भाई पटेल, ग्रामपंचायत सदस्य दगडू कानडे, ग्रामपंचायत सदस्य बन्सी भाऊ लेंडाळ, संजय राऊत, सूर्यकांत नांदुरकर, साळुंके, शाळेचे मुख्याध्यापक पठाण अजिम, दिलावर अहिरे, बी.यु, मस्के किसन डि, शिंदे बी.एन, टकले पी.बी, येडे एस.एल, खांडेकर मॅडम सह यावेळी उपस्थित होते. तसेच मराठी पत्रकार परिषदेचे माजी तालुकाध्यक्ष सुधाकर काका पोटभरे, मराठी पत्रकार परिषदेचे वडवणी तालुकाध्यक्ष सतीश सोनवणे, डिजिटल मीडियाचे तालुकाध्यक्ष ओमप्रकाश साबळे,पत्रकार धम्मपाल डावरे,पत्रकार गीतांजली लव्हाळे,पत्रकार संभाजी लांडे, पत्रकार वाजेद पठाण,पत्रकार महेश सदरे, पत्रकार विजय राऊत, पत्रकार हरि पवार पत्रकार, रामचौरे पत्रकारसह उपस्थित होते.

## माजलगावची पत्रकारिता नि:पक्षपातीपणाची: आ. प्रकाश सोळंके

### आई – वडीलांची सेवा करणा–यांना काशीसारखे तिर्थक्षेत्र करण्याची गरज नाही: मा. आ. बाजीराव जगताप ; माजलगावात दर्पणसह विवीध पुरस्काराचे मोठ्या थाटामाटात वितरण

**माजलगाव । प्रतिनिधी**

कै. बाळशास्त्री जांभेकर यांच्या विचारांचा वारसा माजलगाव पत्रकार संघाने जोपासला असुन माजलगावची पत्रकारिता नि:पक्षपातीची असल्याचे आमदार प्रकाश सोळंके यांनी सांगीतले तर आई – वडीलांची सेवा करणा–यांना काशीसारखे तिर्थक्षेत्र करण्याची गरज नाही असल्याचे माजी आमदार बाजीराव जगताप यांनी सांगीतले. माजलगाव पत्रकार संघाच्या वतीने दर्पणसह विवीध पुरस्काराचे वितरण दि. ६



जानेवारी २०२६ रोजी शहरातील वैष्णवी मंगल कार्यालयात मोठ्या – थाटामाटात करण्यात आले यावेळी ते बोलत होते.

अध्यक्षस्थांनी जेष्ठ पत्रकार उमेश मोगरेकर हे तर आमदार प्रकाश सोळंके, आयुष्यमान भारतचे प्रमुख ओमप्रकाश शेटे, सत्कारमुर्ती मा. आ. बाजीराव जगताप, मंगलाताई सोळंके, सुधाकर देशमुख, शेख अब्दुल सत्तार, नुतन नगराध्यक्षा शिफा चाउस, मा. आ. मोहनराव सोळंके, मा. आ. राधाकृष्ण होके पाटील, बहुजन नेते बाबुराव पोटभरे, सहाल चाउस, दयानंद स्वामी, मिलींद आवाड, संपादक शिरीष देशमुख, अनंतशास्त्री जोशी, उपसभापती श्रीहरी मोरे, अशोक डक, नितीन नाईकनवरे, सौ. सुनिता देशमुख यांची उपस्थिती होती. सिंदफणा पब्लिक स्कुलच्या संगीतमंचाने स्वागतगीत ▶ उर्वरित पान २ वर